(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

[१९६१] -२ एस. सी. आर. - ५८४

कांतीलाल मणिलाल आणि इतर

आयकर आयुक्त, बॉम्बे

[न्या. जे. एल. कपूर, न्या. एम. हिदायतुल्ला आणि न्या. जे. सी. शहा]

आयकर-बाजारमूल्याच्या निम्म्या दराने नवीन समभाग वाटप - तसे करणे म्हणजे लाभांशाचे वितरण करणे - करनिर्धारण - चे पुन्हा सुरू करणे - भारतीय आयकर अधिनियम, १९२२ (१९२२ चा ११), कलम २ (६ अ) (अ), ६६ (१).

अपीलकर्ते नवजीवन मिल्स लिमिटेड नावाच्या कंपनीचे भागधारक होते, ज्यांच्याकडे बँक ऑफ इंडियाचे मोठ्या प्रमाणात समभाग होते. बँकेने आपले भागभांडवल वाढविण्याच्या उद्देशाने मिल्सना प्रीमियमसह (अधीमूल्य) असलेल्या किंमतीला, जे बाजारमूल्याच्या निम्मे होते, आणखी काही समभाग देऊ केले. मिल्सने स्वतःच्या निधीतून, अशा प्रकारे देऊ केलेले काही समभाग विकत घेतले आणि त्यांच्याकडे असलेल्या एका समभागासाठी बँकेच्या दोन समभागांच्या प्रमाणात उर्वरित समभाग आपल्या भागधारकांना मिळविण्याचा अधिकार वाटला. बँक ऑफ इंडियाच्या समभागांचा हक्क सोडणे म्हणजे लाभांशाचे वितरण करणे आहे, या आधारावर आयकर अधिकाऱ्याने आयकर अधिनियमाच्या कलम ३४ (१) (अ) अंतर्गत अपीलकर्त्याचे करनिर्धारण

पुन्हा उघडले. आयकर अधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील अयशस्वी ठरल्यामुळे, अपीलकर्त्यांच्या सांगण्यावरून उच्च न्यायालयाने खालील प्रश्न तयार केला :-

"या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती पाहता नवजीवन मिल्स लिमिटेडने करपात्र व्यक्तीच्या बाजूने बँक ऑफ इंडियाच्या समभागांसाठी अर्ज करण्याचा अधिकाराचे वितरण करणे म्हणजे "लाभांश" वाटप करण्यासारखे होते का?

उच्च न्यायालयाने प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले. अपीलावर, उच्च न्यायालयाच्या प्रमाणपत्रासह,

असा निर्णय देण्यात आला की, उच्च न्यायालयाने घेतलेला दृष्टिकोण बरोबर होता.

मिल्सच्या भागधारकांना त्यांच्याकडे असलेल्या प्रत्येक समभागासाठी बँक ऑफ इंडियाचे दोन समभाग बाजारमूल्याच्या निम्म्या दराने मिळविण्याचा हक्क वितरित करणे म्हणजे "लाभांश" वाटप करण्यासारखे होते, जो कर आकारण्यास पात्र होता.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ३६४/१९५७.

आय. टी. आर. क्र.३१/१९५५ मधील भूतपूर्व बॉम्बे उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय आणि आदेश दिनांक २२ फेब्रुवरी १९५६ मधून उद्भवलेले अपील.

एन. अ. पालखीवाला आणि आय. एन. श्रॉफ, आपिलकर्त्यांकरता.

ए. एन. क्रिपाल आणि डी. गुप्ता, उत्तरवादींनकरीता.

१९६०, नोव्हेंबेर २२. **न्या. शाह** यांच्या द्वारे न्यायालयाचा न्यायनिर्णय देण्यात आला होता.

बॉम्बे येथील उच्च न्यायायलयाच्या अधिकारातेने एक महत्वाचा प्रश्न गुंतलेला आहे असे प्रमाणित करून दिलेल्या परवानगी सह हे अपील सात अपीलकर्त्यांद्वारे दाखल करण्यात आले आहे.

नवजीवन मिल्स लिमिटेड, कलोल या पब्लिक लिमिटेड कंपनीच्या - यापुढे मिल्स म्हणून संबोधले आहे, तिच्या ८०० समभागांच्या एकूण समभागांनपैकी ५७० समभाग अपीलकर्त्यांकडे होते. १९४३-४७ या वर्षांमध्ये मिल्सने बँक ऑफ इंडिया लिमिटेडचे ५,००० समभाग विकत घेतले. ६ मे १९४८ रोजी झालेल्या बँक ऑफ इंडियाच्या भागधारकांच्या जादा सर्वसाधारण सभेत बँकेचे भागभांडवल वाढवण्याचा आणि त्यासाठी विद्यमान भागधारकांनी धारण केलेल्या प्रत्येक तीन समभागांमागे एक नवीन समभाग या प्रमाणात नवीन समभाग देण्याचा ठराव संमत करण्यात आला. नव्या समभागांची दर्शनी किंमत रुपये ५० असणार होती, पण या समभागांना रुपये ५० च्या अधीमूल्यावर जारी करण्यात आले. भागधारकांना प्रत्येक नवीन समभागासाठी रुपते १०० मोजावे लागत होते. ५,००० समभागाचे धारक म्हणून मिल्स बँक ऑफ इंडियाचे १,६६६ २/३ समभाग रुपये १०० प्रति समभाग या दराने घेण्यास हक्कादार ठरली. बँक ऑफ इंडियाने २५ मे १९४८ च्या पत्राद्वारे आपला ठराव कळविला आणि त्यासोबत तीन फॉर्म्स जोडले, स्वीकृतीसाठी फॉर्म ए, त्यागासाठी फॉर्म बी आणि फॉर्म सी ज्याला नामनिर्देशित व्यक्तींना वाटप करण्यासाठी फॉर्म म्हटले जाऊ शकते, असे तीन फॉर्म जोडले. परिपत्रक पत्र प्राप्त होताच मिल्सच्या संचालकांनी खालील ठराव संमत केला :

"असा ठराव करण्यात येतो की, बँक ऑफ इंडिया लिमिटेडच्या भांडवलात, ५,००० सर्वसाधारण समभाग धारण करत असलेल्या कंपनीकडे आता सदर बँकेकडून सूचना प्राप्त झाली

की, या कंपनीला भांडवल म्हणून रुपये ५० आणि प्रत्येक समभागा मागे अधिमूल्य म्हणून रुपये ५० भरल्यावर १,६६६ २/३ अधिक सर्वसाधारण समभाग मिळण्याचा . हक्क आहे आणि या कंपनीचा निधी केवळ ६६ समभागांच्या मर्यादेपर्यंतच या बँकेच्या समभागांनमध्ये गुंतवणे आणि या

समभागांच्या उर्वरित १,६०० समभागांना या कंपनीच्या भागधारकांमध्ये, त्यांच्याकडे या कंपनीत असलेल्या समभागांच्या प्रमाणात या कंपनीचा हक्क वाटणे योग्य मानले जाते. याद्वारे असा ठराव करण्यात येतो की, बँक ऑफ इंडिया लिमिटेडने देऊ केलेल्या १,६६६ समभागांपैकी ६६ समभागांमध्ये या कंपनीचा निधी गुंतविता येईल आणि उर्वरित १,६०० समभागांचा हक्क या कंपनीने धारण केलेल्या एका सर्वसाधारण समभागामागे बँकेच्या दोन समभागांच्या हक्काच्या प्रमाणात या कंपनीच्या ८०० समभागांमध्ये वितरित करण्यात येतो. .

व्यवस्थापकीय एजंट भागधारकांना, ते तसे करण्यास इच्छित असल्यास, त्यांचा अधिकार वापरण्यासाठी सूचित करण्यासाठी पावले उचलू शकतात.

त्यानुसार मिल्सने, देऊ केलेल्या समभागांपैकी, केवळ ६६ समभाग ताब्यात घेण्याचा अधिकार वापरला आणि उर्वरित १६०० समभागांचा हक्क आपल्या ८०० भागधारकांना वितरित करण्याचा ठराव करण्यात आला. सात अपीलकर्ते, मिल्सच्या ५७० समभागांचे धारक म्हणून बँक ऑफ इंडियाच्या १,१४० समभागांचे हक्कदार बनले. अपीलकर्त्यांनी हे समभाग देण्यास सहमती दर्शविली आणि अखेरीस ते एका खाजगी कंपनीकडे - जेसिंगबाई इन्व्हेस्टमेंट कंपनी लि. कडे हस्तांतरित केले.

बँक ऑफ इंडियाच्या समभागांचा हक्क सोडणे म्हणजे "लाभांश" वितरित करणे आणि करपात्र असले तरी भागधारकांच्या बाजूने सोडलेल्या हक्काचे मूल्य अधिनियमाच्या कलम १२ अंतर्गत करातून सुटका करून घेणे होते, या आधारावर आयकर अधिकाऱ्याने आयकर अधिनियमाच्या कलम ३४ (१) (अ) अंतर्गत सात अपीलकर्त्याचे आणि इतर भागधारकांचे करनिर्धारण पुन्हा उघडले. आयकर अधिकाऱ्याचा सात आपिलर्त्यांच्या उत्पन्नाचे पुनकरनिर्धारण करण्याचा आदेश अपील सहाय्यक आयुक्त आणि अपील न्यायधिकरनाद्वारे आपिलात कायम करण्यात आला. अपीलकर्त्यांच्या सांगण्यावरून न्यायधिकरणाने आयकर अधिनियमाच्या कलम ६६ (१) अन्वये खालील प्रश्न मुंबई उच्च न्यायालयात सादर केला होता.

" या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती पाहता नवजीवन मिल्स लिमिटेडने करपात्र व्यक्तीच्या बाजूने बँक ऑफ इंडियाच्या समभागांसाठी अर्ज करण्याचा अधिकाराचे वितरण करणे म्हणजे भारतीय आयकर अधिनियमाच्या कलम २ (६ अ) च्या अर्थांतर्गत "लाभांश" वाटप करण्यासारखे होते का?”

उच्च न्यायालयाने या प्रश्नाची फेरमांडणी पुढीलप्रमाणे केली:

"या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती पाहता नवजीवन मिल्स लिमिटेडने करपात्र व्यक्तीच्या बाजूने बँक ऑफ इंडियाच्या समभागांसाठी अर्ज करण्याचा अधिकाराचे वाटप करणे म्हणजे "लाभांश" वाटप करण्यासारखे होते का?

आणि त्याचे उत्तर होकारार्थी दिले.

उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की कलम २(६ अ) मधील "लाभांश" ची व्याख्या समावेशक होती आणि परिपूर्ण व्याख्या नव्हती आणि बँक ऑफ इंडियाच्या समभागांच्या हक्काचे वितरण कलम २ (६ अ) मधील त्या अभिव्यक्तीच्या विस्तारित अर्थात लाभांश म्हणून मानले जाऊ शकत नसले तरी ते अभिव्यक्तीच्या सामान्य अर्थांतर्गत लाभांश होते आणि अपीलकर्त्यांच्या हातात उत्पन्न म्हणून करपात्र होती.

आयकर अधिनियमाच्या कलम २ (६ अ) मधील व्याख्येच्या अर्थांतर्गत लाभांश असलेल्या बँक ऑफ इंडियाच्या समभागांच्या हक्काच्या वितरणाशी स्पष्टपणे संबंधित असलेल्या प्रश्नाचे स्वरूप लक्षात घेता, प्रश्नाची व्याप्ती वाढविण्यात आणि त्याचा सामान्य अर्थ विचारात घेता त्याचे उत्तर देताना उच्च न्यायालयाने उचित समर्थन केल नाही, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला. या म्हणण्यात कोणतेही तथ्य नाही. "लाभांश" ची व्याख्या कलम २ (६ अ) मध्ये विविध बाबींचा समावेश आणि इतर काही बाबींचा समावेश नाही जे या आपिलाच्या हेतूने मांडण्याची आवश्यकता नाही. "लाभांश" त्याच्या सामान्य अर्थाने म्हणजे एखाद्या कंपनीच्या नफ्याचा किंवा उत्पन्नाचा वितरणात्मक हिस्सा आहे जो त्याच्या भागधारकांना दिला जातो. जेव्हा विधानमंडळाने कलम २ (६ अ) द्वारे "लाभांश" या शब्दाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला तेव्हा इतर अनेक प्रकारच्या प्राप्तींची या अभिव्यक्तीच्या सामान्य अर्थात भर पडली, ज्या अन्यथा त्यात समाविष्ट केल्या जाऊ शकत नाही. "लाभांश" म्हणजे २ (६ अ) च्या व्याख्येत सामान्यत: समजल्याप्रमाणे लाभांश आणि त्याच्या सूचित अर्थात व्याख्येत नमूद केलेल्या इतर प्राप्ती. बँक ऑफ इंडियाच्या समभागांसाठी अर्ज करण्याच्या अधिकाराचे वितरण म्हणजे कलम २ (६ अ) च्या अर्थांतर्गत लाभांशाचे वितरण आहे का? असा प्रश्न लवादाने संदर्भित केला होता आणि त्या प्रश्नाचे उत्तर

देताना उच्च न्यायालयाने त्या अभिव्यक्तीचा सामान्य आणि विस्तारित अर्थ दोन्ही विचारात घ्यावयाचा होता. न्यायाधिकरणाने तयार केलेल्या प्रश्नात अपीलकर्त्यांना मिळालेल्या प्राप्ती केवळ कलम २ (६ अ) मधील त्या अभिव्यक्तीच्या विस्तारित व्याख्येतच लाभांश आहे का, या प्रश्नावर सल्ला देण्यासाठी उच्च न्यायालयाला फर्मावण्यात आले होते, असे काही निदेशीत केल्याचे दिसत नाही.

असे आवाहनही करण्यात आले की, मिल्सने तिच्या समभागधरकांनी बँक ऑफ इंडियाचा नवीन समभाग खरेदी करण्याचा पर्याय वापरावा, असा प्रस्ताव पुढे करताना मिल्सने कोणताही लाभांश वितरित केला नाही. बँक ऑफ इंडियाने दिलेला प्रस्ताव स्वीकारण्यास मिल्स बांधील नव्हते, हे खरे आहे, पण हा प्रस्ताव स्वीकारणे मिल्ससाठी कितीही फायद्याचे असले तरी मिल्सना हा प्रस्ताव सोडून देण्याचा मार्ग मोकळा होता. मिल्सकडे तीन पर्याय होते, (१) समभाग स्वीकारणे, (२) समभाग स्वीकारण्यास नकार देणे, किंवा (३) ते आपल्या नामनिर्देशित व्यक्तीला सुपूर्द करणे. हे निर्विवाद आहे की जेव्हा बँक ऑफ इंडियाने आपल्या भागधारकांना हे समभाग देऊ . केले, तेव्हा समभागासाठी अर्ज करण्याच्या अधिकाराचे बाजारमूल्य प्रति समभाग रुपये १०० होते. नवीन समभागाची दर्शनी किंमत रुपये ५० होती, परंतु भागधारकांना रुपये ५० चे अधिमूल्य द्यावयाचे होते, अशा प्रकारे त्यामुळे नवीन समभाग मिळविण्यासाठी एकूण रुपये १०० भरावे लागले. नवीन समभागांचा बाजारात किंमत रुपये २०० पेक्षा जास्त होती : आणि बँक ऑफ इंडियाने देऊ केलेल्या हक्काखाली समभाग मिळविण्यासाठी देय रक्कम आणि समभागांची बाजारातील किंमत यातील फरक निर्विवादपणे हक्काचे मूल्य होते. जर मिल्सला तसे करण्याची इच्छा नसेल तर त्यांना हा लाभ घेण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही: ते समभाग स्वीकारू शकतात किंवा ते समभाग

स्वीकारण्यास नकार देऊ शकतात किंवा ते आपल्या नामनिर्देशित व्यक्तींच्या नावे स्वाधीन करण्याचा पर्याय वापरू शकतात. हा शेवटचा पर्याय समभाग घेणाऱ्या नामनिर्देशित व्यक्तिद्वारे वापरला जाऊ शकतो आणि मिल्सने तसेच केले. मिल्सने बँक ऑफ इंडियाला त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तींच्या नावे समभाग वाटप करण्याची विनंती केली आणि त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तींच्या नावे समभाग वाटप करण्याची विनंती म्हणजे हक्कांचे हस्तांतरण करण्यासारखे आहे. आपल्या ठरावाद्वारे मिल्सने, वास्तविकपणे, त्यांच्या भागधारकांनी धारण केलेल्या प्रत्येकी रुपये २०० मूल्याच्या समभागाच्या हक्कांचे हस्तांतरण केले. हे स्पष्टपणे मिल्सच्या भांडवलाचे वितरण नव्हते. बँक ऑफ इंडियाच्या समभागांचा हक्क बाजारात विकणे आणि त्यातून मिळणारे उत्पन्न भागधारकांमध्ये वाटणे मिल्सला खुले होते. असे वितरण नि:संशयपणे लाभांशाचे वितरण झाले असते. जर बाजारातील हक्क विकण्याऐवजी आणि त्यानंतर त्यातून मिळणाऱ्या रकमेचे वितरण करण्याऐवजी मिल्सनी थेट हक्क हस्तांतरित केला, तर, भागधारकांच्या हातात लाभांशाचा फायदा टिकूनच होता.

लाभांश पैशात वाटण्याची गरज नाही; हे मालमत्ता किंवा आर्थिक मूल्य असलेल्या हक्काच्या वितरणाद्वारे वितरित केले जाऊ शकते. हे खरे आहे की या ठरावात लाभांश म्हणून भागधारकांमध्ये हक्क वाटण्याचा हेतू नव्हता. लाभांश वाटपाच्या ठरावाचे स्वरूपही त्याने घेतले नाही ; आर्थिक मूल्य असलेल्या हक्काच्या वितरणाचे रूप त्याने घेतले. परंतु वितरणाला मंजुरी देणाऱ्या ठरावाच्या स्वरूपाने ठरावाचे खरे स्वरूप बदलता आले नाही. त्यामुळे मिल्सच्या भागधारकांकडे असलेल्या प्रत्येक समभागासाठी बँक ऑफ इंडियाचे दोन समभाग (त्यांच्या बाजारमूल्याच्या निम्म्या किंमतीने)

अर्ज करण्याचा आणि मिळविण्याचा अधिकार वितरित करणे म्हणजे लाभांशाचे वितरण करणे होय, असे उच्च न्यायालयाचे म्हणणे योग्य आहे, असे आमचे मत आहे.

अपील अयशस्वी ठरले आहे  आणि खर्चासह फेटाळण्यात येत आहे.

अपील फेटाळले .

**x-x-x-x**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**